ठाणें

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
08210
विषय ..............
दा. क्र.



IRBK-0107627

सौ. सुमति पायगांवकर

## लक्लक् नि सुनंदा :

**लक्लक् नि सुनंदा** हें सौ. सुमतीबाई पायगांवकरांचें पुस्तक वाचतांना कोंबडीताईच्या धांदरट लक्लक्बद्दल मला खूप सहानुभूति वाटली.

कोंबडीताई आणि तिचीं पिलें यांचें खाणें, पिणें, फिरणें, झोंपणें इत्यादि गोष्टींचें लेखिकेनें सोप्या पण रसरशीत शब्दांत बहारदार वर्णन केलें आहे. लक्लक् हें कोंबडीचें पिल्लूं, पण प्रत्येक घरांतल्या दुसऱ्या धांदरट पण मनानें चांगल्या असलेल्या मुलाची आठवण करून देतें. या मुलांना प्रेमळपणानें योग्य वळण लावलें तर तीं इतरांपेक्षां थोडीं अधिकच चांगलीं होतात.

लक्लक्ला छोटी सुनंदा भेटते तेव्हां हेंच होतें. प्रेमळ सुनंदाच्या संगतीनें लक्लक् शाळेंत जाऊं लागतो आणि शहाण्यासारखा वागूं लागतो.

लक्लक्शीं समरस झालेले बालवाचक नकळत शहाणपणा शिकतील.

—अनंत काणेकर

# लक्लक् नि सुनंदा

ग्रंथ संग्रहालय
अनु. क्र. २५५८४
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ८२९
नों. दि. १५/११/५
वाचनालय शाखा

लेखिका

सौ. सुमती पायगांवकर


IRBK-0107627

IRBK-0107627

किं

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक : **दा. त्र्यं. जोशी**, बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.




एक होतें चिमुकलें गांव.
गांवांत होतें एक घर.
घराजवळ होतें एक खुराडें.
खुराड्यांत रहायची एक कोंबडीताई.
कोंबडीताईला पांच पिलें होतीं.
पहिलीं चारहि पिलें शांत होतीं.
सारीं कामें तीं नीट करायचीं.
आईनें सांगितलेलें नीट ऐकायचीं.
पण पांचव्या पिलाला तें येईचना !
पांचवें पिलूं वेगळेंच होतें.
त्याचें नांव लक्लक् होतें.
लक्लक् भारीच गडबड करी.
भारीच धांदरटपणा करी.
एका जागीं नीट बसेचना !
तो इकडे धांवायचा; तिकडे धांवायचा.
एकसारखा उड्याच मारायचा.
नीट कधीं चालेचना !

कोंबडीताई एकदां म्हणाली देखील.
“ लकूलक् ! तूं अगदीं ऐकत नाहींस.
उड्या मारायचं सोडीत नाहींस.
पायबीय मोडून घेशील.
मग मात्र रडत बसशील.
मग मी मुळींच समजावणार नाहीं ! ”
लकूलक् लगेच म्हणाला,
“ माझा पाय मोडणारच नाहीं मुळीं.
अन् मीं रडणारच नाहीं मुळीं. ”
लकूलकूला भीतीच वाटत नसे.
तो खुशाल कुठेंहि जायचा.
एखाद्या फुलपांखराच्या मागें धांवायचा.
चिमण्यांच्या मागें जायचा.
जातां जातां जेवायचेंहि विसरायचा !
मग कोंबडीताई त्याला शोधून आणायची
नि त्याला जेवूं खाऊं घालायची.



फुलपांखराच्या मागें धांवायचा.



# लकलकचीं कामें

कोंबडीताई रोज पहाटे उठायची.
हळूहळू पिलांना उठवायची.
पिलें चटपट तोंड धूत.
कोंबडीताईबरोबर बाहेर जात.
पहिलीं चारहि पिलें नीट दाणे टिपीत.
कोंबडीताईचीं कामें करीत.
पण लकलक नीट कांहीं करीचना !
इकडे पाहायचा, तिकडे पाहायचा.
डबक्यांत होडया सोडायचा.
पानांच्या पिपाण्या करायचा.
साळुंक्यांच्या मागें धांवायचा.
गवताच्या भाऱ्यांवर चढायचा.
उशीर झाला कीं कोंबडीताई शोधायला येई.
आणि लकलकला घरीं घेऊन जाई.
जेवणें झाल्यावरहि पिलें कांहीं तरी करीत.
कोंबडीताईला मदत करीत.



म्हशीच्या पाठीवर बसायचा !


साफसूफ करीत, नाहींतर अभ्यास करीत.
पण लकूलकूला तें येईचना !
मग तो दारावर चित्रें काढायचा.
खडूच्या रेघोट्या ओढायचा.
नाहींतर उन्हांत फिरायचा.
म्हशीच्या पाठीवर बसायचा !
कधीं हळूंच न्हाणीघरांत जायचा
नि आपला सदराच धूत बसायचा !
साबूची वडी पाण्यांतच पडायची.
नि सगळीकडे चिखलच चिखल व्हायचा.
कांहीं वेळानें कोंबडीताई तिथें यायची.
मग लकूलकूची घाबरगुंडी उडायची.


मग तो हळूंच दाराआड लपायचा.
तिथून कोंबडीताईला विचारायचा,
" आई ग, तूं रागावणार आहेस ? "
कोंबडीताई म्हणायची,
" कशासाठीं पण ? काय केलंस तूं ? "
लक्लक् म्हणायचा,
"पण कबूल कर ना कीं रागावणार नाहींस. "
कोंबडीताई म्हणायची,
" अरे पण झालं तरी काय ? "
लक्लक् दाराआड उभे राहून म्हणायचा,
" मी किनई हा खांद्यावरचा सदरा धुतला.



" मी किनई हा खांद्यावरचा सदरा धुतला. "


पण तिथं चिखलच झाला.
आणि साबू पाण्यांतच पडला.
मी मुद्दाम नाहीं टाकला कांहीं !"
कोंबडीताई म्हणायची,
"पण तूं सदरा धुतलासच कां आधीं ?
कोणी सांगितलं होतं तुला ?"
लक्लक् म्हणायचा,
"तो मळला होता ग, म्हणून धुतला.
बघ, कसा साफ साफ केला !
आहे ना मी शाहाणा ?—
मग ? कशी नाहीं म्हणतेस !"







संध्याकाळीं कोंबडीताई फिरायला जाई.
पिलें पण बरोबर फिरायला जात.
तीं सारीं कधीं बागेंत जात.
तर कधीं तळ्याच्या कांठीं जात.
तर कधीं कोंबडीताईच्या मैत्रिणींच्या घरीं जात.
कधीं बदकूताईच्या घरीं—
तर कधीं कबूतरकाकूंच्या घरीं.
कोंबडीताईचीं पिलें दुसऱ्या पिलांशीं खेळत.
कोंबडीताईच्या मैत्रिणी छान छान खायला देत.
खेळायला छानदार खेळणीं देत.
कधीं पतंग, तर कधीं भोंवरा !
अंधाराच्या आधीं कोंबडीताई परत यायची.

पिलें पण संध्याकाळची मजा पहात परत यायचीं.
कोंबडीताई त्यांना म्हणायची,
" चला रे लवकर, लवकर.
" बोकोबा येईल, नाहीं तर कोल्होबा येईल. "
मग सगळीं पिलें घाबरून जात.
कोंबडीताईच्या अंगाअंगाशीं चालत.
भराभर भराभर चालत.
घरीं आल्यावर पिलें हातपाय धूत.
साधेंच कांहीं तरी जेवत.
मऊमऊ भात किंवा तूप-खिचडी.
जेवण झालें कीं पिलांना झोंप येई.
तीं सगळीं मग कोंबडीताईच्या जवळ जायचीं.
कोंबड़ीताईच्या कुशींत गुडुप झोंपून जायचीं.



मग सगळीं...भराभर भराभर चालत.




अनुक्रमांक २५७५७
विभाग बाबा
क्रमांक २२९
नों. दि. १८/११/५८

लक्लक्ची नेहमींच गडबड !
तो कांहींतरी गोंधळ करी.
मग कोंबडीताईची धांवपळ होई.
एकदां सकाळची वेळ होती.
कोंबडीताई बाजारांत जायला निघाली.
सगळीं पिलें पण बरोबर निघालीं.
कोंबडीताईच्या घराजवळ शेतें होतीं.
शेतापलीकडे बाजार होता.
शेतांतून आगगाडीचा रस्ता होता.
तिथें येतांच कोंबडीताई म्हणाली,
" मुलांनो, भरभर चला हं,
गाडी यायची वेळ झाली हं. "
पहिलीं चारही पिलें पटकन् पुढें झालीं.
कोंबडीताईच्या जवळून चालूं लागलीं.
पण लक्लक्ला तितक्यांत एक पोपट दिसला !



धाड्–धाड्–धडड–धडड...


एका झाडावर मजेंत
बसलेला दिसला !
लक्लक् पोपटाकडेच पहात राहिला.
कोंबडीताई रूळ ओलांडून गेली होती.
इतक्यांत लक्लक्नें गाडीचा आवाज ऐकला.
“ धाड्–धडड--धडड--धडड.... ! ”
तो पटकन् रुळांच्या अलीकडे थांबला.
एक भला मोठा दगड होता तिथें.
त्या दगडामागें तो लपून बसला.
अगदीं आंग चोरून, कान दाबून बसला.
गाडी धाड्-धाड्-धाड्-करीत आली.
धाड्-धाड्-धडाड् करीत निघून गेली.
तेवढ्यांत कोंबडीताई परत आली होती.
गाडीचा आवाज ऐकून आली होती.
लक्लक्ला हांका मारीत होती.

इतक्यांत लक्लक्नें तिला पाहिलें.
त्यानें धांवत जाऊन तिला मिठी मारली.
कोंबडीताई म्हणाली,
" अरे होतास तरी कुठं ? गाडी आली होती ना ! "
लक्लक् म्हणाला,
" अग पोपट पहात होतों मी.
ती गाडी उगीचच मधें आली.
माझा पोपट गेला ना उडून ! "




कोंबडीताई परत आली होती.

# लकूलकू आणि चांदोबा




कोंबडीताईचें खुराडें एका घराजवळ होतें.
तें घर फार छान होतें.
घराला माडी होती.
लकूलकूला वाटे—
" आपण माडीवर जावें—तिथून छपरावर !
छपरावरून लिंबोणीच्या झाडावर !
नि झाडावरून सरळ आभाळांत !
आभाळांत ढगामागें चांदोबा लपतो.
आपण त्याला शोधून काढूं.
त्याच्याशीं मग लपालपी खेळूं."
एकदां पिलें गोष्टी वाचीत होतीं.
लकूलकू चित्रें पहात होता.
कोंबडीताई पिलांना म्हणाली,
" पिशव्या घ्या नि जरा त्या माडीवर जा.
तिथें शेजारच्या बाईंनीं जोंधळे वाळत घातले होते.
त्यांतले खालीं सांडलेले जोंधळे घेऊन या.
मी ते चटकन् पटकन् दळीन.



पण–समोर पाहातो तों काय !

नि तुम्हांला ऊन ऊन भाकरी वाढीन. ”
पहिलीं चारही पिलें माडीवर गेलीं.
पटापट दाणे गोळा करूं लागलीं.
लकुलकु पण गेला माडीवर.
पण तो पळाला छपरावर !
तो मनांत म्हणाला,
“ दाणे गोळा होईतों चांदोबाला भेटून येऊं.
मग पिशव्या घेऊन खालीं जाऊं. ”
तो छपरावरून झाडावर जाणार होता.
पण–समोर पाहातो तों काय !
झाडावर भली मोठी घार येऊन बसलेली !

लक्लक्चे पाय लटलट कांपूं लागले.
पण तो हुशार होता.
तो मोठमोठ्यानें हांका मारूं लागला,
" ए आई ! घार आली ग आई ! "
कोंबडीताई धांवतच वर आली.
तिला पाहतांच घार उडून गेली.
कोंबडीताई लक्लक्ला म्हणाली,
" तुला आतां करूं तरी काय ?
कशाला आला होतास इथें ? "
लक्लक् म्हणाला,
" अग मी चांदोबाकडे जाणार होतों.
ही घारटली उगाच आली मधें ! "




# आई रागावली



दुसरे दिवशीं कोंबडीताई म्हणाली,
" हें बघ लक्लक्,
तूं अगदीं ऐकत नाहींस.
नाहीं तेच गोंधळ करतोस.
आजपासून तूं बाहेरच जाऊं नकोस ! "
लक्लक् म्हणाला,
" अगदीं तुझ्याबरोबर देखील नको ? "
कोंबडीताई म्हणाली,
" माझ्याबरोबर देखील नको ! "
लक्लक्नें रडक्या आवाजांत विचारलें,
" मग मी करूं तरी काय ? "
कोंबडीताई रागांत म्हणाली,
" शेजारच्या ओसरीवर खेळ हवं तर.

नाहींतर आपल्या या इथंच बसून रहा.'"
कोंबडीताई इतर पिलांना घेऊन बाजारांत गेली.
बिचारा लकूलकू एकटाच राहिला.
तो शेजारच्या ओसरीवर गेला.
ओसरीवर तो फिरूं लागला.
समोर त्याला एक भोपळा दिसला.
लकूलकूनें ठरवून टाकलें,
"आपण या भोपळ्यांतच राहात जाऊं !"
त्यानें चोंचीनें भोपळ्याला टोंचे मारले.
एक मोठेंसें भोंक तयार केलें.
भोंकांतून तो आंत शिरला—
नि मजेंत बिया खात बसला !



नि मजेंत बिया खात बसला !

कांहीं वेळानें घराची मालकीण आली.
तिनें भोपळा नेला नि विळीवरच धरला.
लक्लक्ची जी घाबरगुंडी झाली !
त्यानें भोकांतून ताड्‌दिशी बाहेर उडी मारली !
तो जोरांत धांवत सुटला.
मालकिणीच्या छोटया मुलीनें त्याला पाहिलें.
ती त्याच्या मागोमाग धांवली.
तो केव्हांच खुराडयाजवळ येऊन बसला होता.
थरथरत बसला होता.
ती मुलगी त्याला गोंजारून म्हणाली,
" घाबरूं नकोस रे,
आई कांहीं करणार नव्हती तुला.
येतोस माझ्याशीं खेळायला ? "
लक्लक्ला धीर येऊन तो म्हणाला,
" हो येईन. पण तुझं नांव काय ? "
ती म्हणाली, " सुनंदा. पण आई मला सुना म्हणते.
तुझं नांव सांग ? "
लक्लक् म्हणाला,
" माझं नांव लक्लक्. पण सुनाताई,
तूं माझ्याशीं खरंच खेळशील ? "




# लकलकची भातुकली



दुसरे दिवशीं लक्लक् लवकर उठला.
कोंबडीताई म्हणाली,
“आज कसा रे लवकर उठलास?”
लक्लक् म्हणाला, “उगीच!”
कोंबडीताई नि इतर पिलें मग बाहेर गेलीं.
लक्लक् सुनंदाच्या ओसरीवर गेला.
तिथें सुनंदा आली नि म्हणाली,
“माझ्याबरोबर भातुकली खेळायला येतोस?”
लक्लक्नें विचारलें,
“भातुकली म्हणजे काय ग?”
सुनंदा म्हणाली,
“माझ्याबरोबर खेळ म्हणजे समजेल.”

IRBK-0107627
IRBK-0107627


मग सुनंदानें आईकडून सामान घेतलें.
कुरमुरे नि दाणे, गूळखोबरें नि चणे.
तिनें एका कोपऱ्यांत बुटकुलीं मांडलीं.
लक्लक्नें तिला मदत केली.
दोघांनीं भातुकलींतला सैंपाक केला.
कुरमुऱ्याचा भात, चण्यांची आमटी,
शेंगदाण्यांची भाजी नि गूळखोबऱ्याचा खाऊ !
लक्लक्ला तर गंमतच वाटली. तो म्हणाला,
" सुनाताई, मी रोज येऊं भातुकली खेळायला ? "
सुनंदा म्हणाली, " अरे, मी तर रोज शाळेंत जातें. "
लक्लक् म्हणाला, " बाप रे, तिथें तर बाई मारतात ! "
सुनंदा म्हणाली, "नाहींच मुळीं. तिथें तर खेळतात सगळीं !
आम्ही झोंपाळ्यावर बसतों, घसरगुंडी खेळतों,
चित्रें काढतों, ठोकळे खेळतों, गाणीं म्हणतों,
गोष्टी सांगतों, नि छान छान खाऊ खातों. "
लक्लक्नें पटकन् विचारलें,
" सुनाताई, मला नेशील तुझ्या शाळेंत ? "



तिथें तर खेळतात सगळीं !




लक्लक् दुसऱ्या दिवशीं लवकर उठला.
कोंबडीताई म्हणाली,
" आजहि कसा रे लवकर उठलास ? "
लक्लक् म्हणाला,
" किनई, मी आज शाळेंत जाणार आहे.
सुनाताई मला शाळेंत नेणार आहे."
कोंबडीताई म्हणाली, " खरंच ? "
कोंबडीताईनें लक्लक्ची तयारी केली.
लक्लक्नें छान छान कपडे केले.



शाळेंत रोज तो मजेंत खेळायचा.